**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४३/२०२०** | **दिनांक २९/०५/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके**, विभाग प्रमुख, कृषिविदया विभाग, ९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे**, नोडल ऑफिसर, कृषिविदया विभाग, ९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव**, तांत्रिक अधिकारी, कृषिविदया विभाग, ८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २३/०५/२०२० ते २९/०५/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ३०/०५/२०१९ सकाळी ८:३० पासून ०३/०६/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३/०५ | २४/०५ | २५/०५ | २६/०५ | २७/०५ | २८/०५ | २९/०५ | | ३०/०५ | ३१/०५ | ०१/०६ | ०२/०६ | ०३/०६ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ० | ० | ६ | ८० | २९ |
| ३४.२ | ३३.० | ३४.२ | ३४.४ | ३४.० | ३४.४ | ३४.३ | कमाल तापमान (अं.से) | ३५ | ३४ | ३४ | ३३ | ३३ |
| २२.५ | २४.० | २४.० | २४.० | २४.० | २४.० | २४.५ | किमान तापमान (अं.से) | २७ | २६ | २५ | २४ | २४ |
| २ | २ | २ | २ | २ | ४ | ४ | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ७ | ८ | ८ | ८ |
| ८३ | ८५ | ८६ | ८२ | ८५ | ८३ | ८१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८८ | ८७ | ८७ | ९० | ८७ |
| ६० | ५८ | ५९ | ६६ | ६४ | ६७ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४९ | ४९ | ५१ | ६४ | ६४ |
| ७.२ | ६.४ | ६.५ | ५.७ | ५.५ | ५.४ | ६.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | १० | ६ | ५ | १४ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | वा. | वा.ऊ. | वा.प. | ई.पू. | आ. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ८.२ | ५१३०.९ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १ ते ३ जून २०२० दरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश ढगाळ राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **संभाव्य टोळधाडीबाबत उपाययोजना** | | टोळकिडीने शेतात प्रवेश करू नये यासाठी शेतकऱ्यांनी खबरदारीसाठी करावयाच्या उपाययोजना<br>• शेताच्या आजूबाजूला मोठे चर खोदणे, रात्रीच्या वेळी झाडा झुडुपावर टोळ जमा झाल्यास शेतामध्ये धूर करणे.<br>• प्रतिबंधात्मक उपाय म्हणून निंबोळी आधारित कीटकनाशक अझाडीरेक्टीन १५०० पी.पी.एम. ३० मि.ली. किंवा ५% निबोळी अर्क प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• भाताच्या तुसामध्ये फिप्रोनील ५ एससी. ३ मि.ली. प्रति २० किलो या प्रमाणात मिसळून आमिष तयार करावे आणि शेतात ठीक ठिकाणी ठेवावेत.<br>• टोळांचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढल्यास केंद्रीय कीटकनाशक बोर्ड यांनी सुचविल्याप्रमाणे क्लोरपायरीफॉस २० ईसी. २४ मि.ली., क्लोरपायरीफॉस ५० ई.सी १० मि.ली., डेल्टामेथ्रीन २.८ ईसी. १० मि.ली., फिप्रोनील ५ एससी. २.५ मि.ली., लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ ईसी. १० मि.ली. यापैकी कोणतेही कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून शक्यतो रात्री उशिरा किंवा पहाटेच्या वेळी टोळ ज्या झाडा झुडुपावर जमा झालेले असतील त्यावर फवारणी करावी. |
| **खरीप भात** | **रोपवाटिका पूर्वतयारी** | • दिनांक १ ते ३ जून दरम्यान पाऊसाची शक्यता असल्याने भात पिकाची पेरणीची कामे हाती घ्यावीत.<br>• जे शेतकरी स्वतःकडे राखून ठेवलेले भात बियाणे पेरणी साठी वापरणार असतील त्यांनी बियाण्यास ३ टक्के मिठाच्या द्रावणाची प्रक्रिया करावी. यासाठी १० लिटर पाण्यामध्ये ३०० ग्रॅम मीठ टाकून द्रावण तयार करावे. द्रावण तयार करताना उपलब्ध भात बियाणे त्यामध्ये बुडेल इतपत द्रावण तयार करावे. बियाणे द्रावणात टाकल्यावर चांगले ढवळावे. चाळणीच्या सहाय्याने तरंगणारे बियाणे वेगळे करावे. जड व तळाला बसलेले बियाणे वेगळे काढून स्वच्छ पाण्याने ३ ते ४ वेळा धुवून ते ४८ तास सावलीत वाळवावे. तसेच पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम थायरम बुरशीनाशक चोळून बियाणे पेरावे.<br>• पेरणीसाठी तयार केलेल्या गादीवाफ्यावर प्रती आर शेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया व ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट आणि ०.८ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावीत. वाफ्यावर ७ ते ८ सें.मी. अंतरावर ओळीमध्ये १ ते २ सें. मी. खोलीवर बी पेरून मातीने झाकावे.<br>• रोपवाटीकेतील तणांच्या नियंत्रणासाठी पेरणीनंतर वाफे ओले होताच ऑक्सीडायरजील ६ ई. सी. ३ मि. ली. प्रती लिटर पाणी या प्रमाणात एकसारखे फवारावे. |
| **नागली** | **रोपवाटीका पूर्वतयारी** | • नागली रोपवाटीकेसाठी पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीची निवड करावी. निवडलेल्या क्षेत्रावर नांगरणी करून जमीन तयार करावी. जमिनीत प्रती गुंठा क्षेत्रास २५० किलो कुजलेले शेणखत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत.<br>• एक एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी २ ते २.५ कि.ग्रॅ. बियाणे वापरावे. एक एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी रोपवाटिका ४ गुंठे क्षेत्रावर तयार करावी.<br>• डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने दापोली नं. १, दापोली सफेद १ (कोंकण सफेद १) आणि दापोली नं. २ |

| | | |
|---|---|---|
| | | या नागलीच्या जाती कोंकण विभागात खरीप लागवडीसाठी शिफारसीत केल्या आहेत. |
| **आंबा** | - | • आंबे काढून झाल्यावर बांडगुळे व वाळलेल्या फांद्या काढून झाडे स्वच्छ करावीत. बांडगुळे मोठी असल्यास फांद्यासह कापून काढावीत आणि कापलेल्या भागांवर बोर्डोपेस्ट किंवा डांबर लावावे.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **नारळ** | - | • नारळ बागेतील सुकलेल्या झावळ्या, पालापाचोळा, गवत काढून बागेत स्वच्छता ठेवावी जेणेकरून नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रण होण्यास मदत होईल. या भुंग्याची पैदास ही शेणखताच्या खड्ड्यात होत असल्याने बागेजवळ शेणखताचे खड्डे असल्यास अशा खड्ड्यात दर दोन महिन्यांनी १.५ टक्का क्लोरोपायरीफॉसची भुकटी मिसळावी. तसेच उपद्रव झालेल्या माडांच्या नवीन सुईतून तारेच्या हुकाने भुंगे बाहेर काढून नष्ट करावेत आणि सुईत सुमारे २५ ग्रॅम १.५ टक्का क्लोरोपायरीफॉसची भुकटी आणि बारीक वाळू यांचे १ : १ या प्रमाणात केलेले मिश्रण भरावे. बागेत गेंडा भुंग्याचा गंध सापळा लावावा.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नारळ बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **सुपारी** | **-** | • सुपारीचे कोळेरोग ह्या बुरशीजन्य रोगापासून संरक्षण करण्यासाठी पावसाळा सुरु होण्यापूर्वी झाडावरील रोगट शिंपुटे, वाळलेल्या झावळ्या गोळा करून नष्ट करावेत व पानांचा बेचक्यात १ टक्का बोर्डोमिश्रणाच्या ३ ते ४ फवारण्या एका महिन्याच्या अंतराने कराव्यात.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, सुपारी बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भेंडी** | **पूर्व तयारी** | • खरीप हंगामात भेंडी पिकाची लागवड करण्यासाठी उत्तम निचऱ्याची सेंद्रिय खताचे प्रमाण असलेली जमीन निवडावी. भेंडी पिकाची जून महिन्यात लागवड करण्यासाठी जमिनीची नांगरणी करून ढेकळे फोडून ६ टन चांगले कुजलेले शेणखत प्रति एकरी मातीत मिसळावे. ६० सें. मी. अंतरावर सऱ्या पाडाव्यात. |
| **दुभती जनावरे** | **-** | • तापमानात वाढ संभवत असल्याने गाभण म्हशींना पाण्याने रोज धुवावे. दिवसातून तीन वेळा स्वच्छ आणि थंड पाणी पाजावे.<br>• गाभण गाई आणि म्हशींना २.५ किलो आंबोण (खुराख), ५ ते ७ किलो वाळलेली वैरण, १५ ते २० किलो हिरवी वैरण प्रति दिन द्यावे तसेच दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो आंबोण (खुराख), १५ ते २० किलो हिरवी वैरण आणि ४ ते ५ किलो वाळलेली वैरण प्रति दिन देण्यात यावी. |
| **कुकुटपालन** | **-** | • ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे पक्षाच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढील चार- सहा आठवड्यांपर्यंत ब्रॉयलर फिनिशर खाद्य द्यावे. तसेच ब्रॉयलर कोंबडीच्या मासातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करण्यासाठी व अधिक वाढीसाठी खाद्याच्या १.५ टक्के काळे जिरे पावडर किंवा ०.५ टक्के हळद किंवा १ टक्का आले भुकटी देण्यात यावी.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |